## नि.क्र. ५ वरील आदेश

सदरचा अंतरिम आदेश मिळण्याकरीताचा अर्ज अर्जदार यांनी अंतरिम पोटगी, प्रवास व ईतर खर्च आणि घरभाडे मिळण्याच्या विनंतीने कलम २० व २३ नुसार केलेला आहे. अर्जदार यांच्या वकिलांचा आणि सामनेवाला यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

२. अर्जदार यांच्या कथनानुसार त्यांचा विवाह सामनेवाला क्र. १ यांच्या सोबत झाला. अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार पासून संरक्षण कायदा २००५ अन्वये मूळ अर्ज दाखल केला असून त्यातील वस्तुस्थिती या अर्जाचा भाग आहे. ती दिनांक ०८ मार्च २०१८ पासून तिच्या दोन्ही मुलासह माहेरी राहत आहे. तिच्या माहेरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने तिच्या दैनंदिन गरजा व मुलांच्या शिक्षणासाठी होणारा खर्च करण्यास अर्जदार असमर्थ असल्याने दैनंदिन गरजा व शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तिचा मुलगा ५ वर्षे १० महिन्याचा झाला असून त्याचे शिक्षण इंग्लिश माध्यमातून झाले असून मुलाचा शैक्षणिक खर्च ती गृहिणी असल्यामुळे तिला झेपणारा नाही. सामनेवाला क्र. १ हा पुणे महानगर पालिकेच्या रुग्णालयात शिपाई म्हणून नोकरीस आहे. सामनेवाला क्र. २ हा येरवडा कारागृह पुणे येथे शासकीय कर्मचारी म्हणून सेवानिवृत्त झालेला आहे. तसेच सामनेवाला यांच्याकडे वाघोली पुणे येथे रिकामी जागा व लोहगाव पुणे येथे तीन मजली इमारत आहे व ती भाडे तत्वाने दिलेली आहे. तसेच बार्शी येथे खुला प्लॉट आह व नागपूर चाळ पुणे येथे दुकान आहे तेही भाड्याने दिलेले आहे. तसेच सामनेवाला क्र. १ यांच्यावर अर्जदारा व्यतिरिक्त कोणाचीही जबाबदारी नाही. वरील परिस्थितीचा विचार करता अर्जदार व तिच्या मुलांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अर्जदाराने कौंटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २० अन्वये तात्पुरत्या स्वरुपाचा आर्थिक मदतीचा आदेश पारित होण्याची विनंती केलेली आहे.

३. सामनेवाला क्र. १ ते ३ यांनी नि. १९ येथे सदर अर्जास म्हणणे देवून कथन केले की अर्ज खोटा व काल्पनिक आहे. तिला कधीही मारहाण व शिवीगाळ सामनेवाला यांनी केली नाही, रॉकेल अंगावर टाकून आम्हाला कायदा माहित आहे

अशी धमकी दिली नाही व कौटुंबिक हिंसाचार केला नाही. दोन्ही अपत्यांचा बाळंतपणाचा खर्च सामनेवाला यांनी केला. याउलट अर्जदार क्र. १ ही मुलांच्या आरोग्याची काळजी करीत नव्हती, त्यांना आंघोळ न घालणे, दूध न पाजणे वगैरे प्रकार करत होती. अर्जदार व लहान मुलांना सामनेवाला यांनी कधीच घरातून हाकलून लावलेले नाही अथवा अर्जदार क्र. १ चा कौटुंबिक हिंसाचार केव्हाही नव्हता व नाही. अर्जदार क्र. १ हिच्या माहेरची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली असल्याने तिने स्वत:हून स्वमर्जीनुसार सामनेवाला क्र. १ यांचा कोणतेही कारण नसताना किरकोळ भांडणावरुन त्याग केला आहे व मुलांचे भवितव्य हेतुपूर्वक उध्वस्त करीत आहे. सामनेवाला क्र. १ याची महिन्याला १५,०००/— देण्याची ऐपत नाही. सामनेवाला अर्जदारा यांना चांगले सांभाळत होता व यापुढेही सांभाळेल. अर्जदार क्र. १ हिचे एम.ए. असे चांगले शिक्षण झाले असून ती गौडगाव, भालगाव येथे खाजगी शिकवण्या घेते. त्यातून तिला दहा ते पंधरा हजार रुपये प्रतिमाह खर्च वजा जात उत्पन्न मिळते. उर्वरित वेळेत शिवणकाम व काच पेंटींग करुन ती पाच ते सात हजार रुपये उत्पन्न मिळविते. केवळ सामनेवाला यांना नाहक त्रास व आर्थिक नुकसान करण्याच्या हेतुने हा खोटा अर्ज दिला आहे व खोटी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सामनेवाला क्र. १ हा सामनेवाला क्र. २ व ३ यांचा एकुलता एक मुलगा असून सामनेवाला क्र. २ यास पॅरालिसीसचा मोठा झटका आलेला असल्याने त्यांना चालता व बोलता येत नाही. त्यांना सांभाळण्याची नैतिक व कायदेशीर कर्तव्य सामनेवाला क्र. १ चे आहे. परंतु अर्जदार क्र. १ हिला आपल्या संसारात सासू—सासरे अजिबात नको या कारणावरुन ती बारीक—सारीक कारणावरुन स्वत:हून भांडण करते ती रागीट हट्टी व चिडखोर आहे. आईवडिलापासून वेगळे रहात नसाल तर मी सासरी येणार नाही असे ती म्हणते. आठ वर्षाच्या लग्नाच्या कालावधीत केवळ दोन ते अडीच वर्षे अर्जदार क्र. १ ही कशीबशी नांदली. सामनेवाला क्र. १ यास काही मोठी नोकरी नाही, तो एक महानगरपालिकेमध्ये शिपाई आहे याचा विचार व्हावा. सामनेवाला क्र. १ आजही अर्जदारांना सांभाळण्यास तयार आहे व एकत्रात संसार करायची त्याची मनापासून इच्छा आहे. अर्जदाराची मागणी बेकायदेशीर व चुकीची आहे. अर्ज नामंजूर करण्याची विनंती सामनेवाला क्र. १ ते ३ यांनी केलेली आहे.

४. मान्य परिस्थितीनुसार अर्जदार यांचा विवाह सामनेवाला क्र.१ यांचेबरोबर झाला असुन त्यांचे पती—पत्नी नाते अद्यापही अस्तित्वात आहे. सध्या ते दोघे विभक्त राहात आहेत. अर्जदार क्र. २ व ३ ही त्यांची अपत्ये असून ती अर्जदारासोबत रहात आहेत.

५. अर्जदाराच्या कथनांनुसार तीच्यावर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. सामनेवाला क्र.१ यांच्या कथनांनुसार अर्जदार हिचे वागणे उध्दटपणाचे व हट्टी होते आणि प्रस्तुत अर्ज सामनेवाला क्र.१ ते ३ यांना मानसिक व शारिरीक त्रास देण्याच्या उद्‌देशाने दाखल केलेला आहे. परंतु अर्जदार विरुद्ध केलेले कथनांचा हा भाग पुराव्याचा विषय आहे. याक्षणी प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी अर्जदारास विभक्त राहात असल्यापासुन त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केलेबाबत कोणताही पुरावा सामनेवालांनी आणलेला नाही. तसेच अर्जदारास उत्पन्नाचे साधन आहे असे सामनेवाला यांनी कथन केले असले तरी त्याबाबत कोणताही पुरावा सामनेवाला यांनी दिलेला नाही. याउलट नि. ८/१ सोबत सामनेवाला क्र. १ याचे वेतन प्रमाणपत्र पाहता, त्यास प्रतिमाह २८,४०४/— उत्पन्न मिळते हे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच पुणे येथील कर आकारणी रजिस्टर उतारा नि. ८/२ वरील पाहता सामनेवाला क्र. २ याच्या नावे आरसीसी बांधकाम असलेले घर दिसून येते. त्यामुळे सामनेवाला क्र. १ यांच्याकडे उत्पन्नाचे साधन असून ते अर्जदार क्र. १ ते ३ यांना पोटगी देण्यास समर्थ असल्याचे सिद्ध होते. परंतु असे असतानाही अर्जदार यांची उदरनिर्वाहाची व्यवस्था ते विभक्त रहात असल्यापासून सामनेवाला क्र. १ यांनी केली असे सामनेवाला यांचे कथन नसल्याने अर्जदार क्र. १ यांचेवर आर्थिक हिंसाचार झालेची बाब प्रथमदर्शनी दिसून येते व त्यामुळे अंतरिम अर्जाप्रमाणे त्यांना तात्पुरत्या स्वरुपाच्या मदतीचा आदेश करणे न्यायोचीत आहे.

६. अर्जदार यांच्या वकिलांच्या युक्तीवादानुसार मूळ अर्जातील कलम ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना अंतरिम आदेशाच्या स्वरुपात प्रति महिना रु. ४०००/— हे अन्न, वस्त्र व औषधोपचारासाठी, शाळेचे शुल्क व ईतर खर्च याकरीता रु. ४०००/— व घर खर्च करीता रु. ७०००/— असे एकुण रु. १५,०००/— प्रतिमाह अंतरिम स्वरुपात आर्थिक मदत होण्याची विनंती केली आहे.

७. नि. २१ वरील बोनाफाईड प्रमाणपत्र पाहता अर्जदार क्र. २ याचे वय ७ वर्षे व अर्जदार क्र. ३ हिचे वय ५ वर्षे दिसून येते. तसेच ते शिक्षण घेत असल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे सामनेवाला क्र. २ हे निवृत्त वेतन धारक आहेत. परंतु त्याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. परंतु दाखल कागदपत्रानुसार .सामनेवाला क्र. १ यांचे साधारण रु. २८,०००/— महिना पगार पाहता तसेच त्यांच्यावर सामनेवाला क्र. २ व ३ या वृद्ध आईवडिलाची जबाबदारी पाहता तसेच त्यांच्या आजारपणाचे वक्तव्य पाहता याक्षणी अंतरिम आर्थिक मदतीकरीता व अर्जदार क्र. २ व ३ यांचा पालनपोषणाचा व ईतर खर्चाचा विचार करता अर्जदार क्र. १ हिस प्रतिमाह रुपये ७,५००/— अंतरिम पोटगी देण्याचे आदेश सामनेवाला क्र. १ हे पती असल्याने त्यांच्या विरुद्ध करणे न्यायोचीत आहे. सबब खालील आदेश—

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जाचा अंतिम निकालापावेतो अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या उदरनिर्वाहाकरीता, पालनपोषणासाठी, शिक्षणासाठी व ईतर खर्चासाठी दरमहा रू.७,५००/— अर्जदार क्र. १ यांना द्यावेत.

३. अर्जाचा खर्च मुळ अर्जाच्या खर्चात समाविष्ठ करण्यात येतो.

(रा. सु. धडके)

दिनांकः २४/०९/२०१९

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
बार्शी, जि. सोलापूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer :- S. V. Kokate

(b) Court :- 2nd Jt CJJD & JMFC Court, Barshi

(c) Judgment signed by P.O.on :- 24.09.2019

(d) Judgment uploaded on :- 25.09.2019